|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
पत्रपेटी, ८०, उमवि नगर (बांभोरी), जळगाव – ४२५००१
A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

**विचारधारा प्रशाळा** **School of Thought**

# कार्यालयीन सूचना

केंद्र शासनाद्वारे दि. ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिन व दि. ०३ ते ०९ ऑक्टोबर हा कालावधी अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो.

तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे हे १०० वे वर्ष आहे. या पार्श्वभूमीवर मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण व मा. मंत्री मराठी भाषा यांच्यात झालेल्या बैठकीत, मराठी भाषेच्या प्रचार – प्रसार व तिचे जतन, संवर्धन व्हावे याकरिता महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये **अभिजात मराठी, अभिमान मराठी** या कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपल्या विद्यापीठात सदरचा कार्यक्रम हा दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ०२:३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | दिनांक | वेळ | ठिकाण | कार्यक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | १४/१०/२०२६ | दुपारी ०२:३० वा. | ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृह | **'अभिजात मराठी, अभिमान मराठी' कार्यक्रम** |

तरी उपरोक्त बाबत कळविण्यात येते की, **सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू महोदय उपस्थित राहणार आहेत.** तरी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहावे.

जा.क्र.कबचौउमवि/वि. प्र./१७२ /२०२६

दिनांक : ०९/१०/२०२६

( डॉ. विनोद पाटील)
कुलसचिव

प्रति,

सर्व मा. संस्थाचालक/ मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित संस्था व महाविद्यालये
कृपया सदरची कार्यालयीन सूचना आपल्या अधिनस्थ मराठी विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.